शासन निर्णय, गृह विभाग, क्र. सीआरपी-०५०६/११३२/ प्र.क्र.२५०/ पोल-७, दिनांक ०८.०३.२०१०, रद्द करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग

शासन निर्णय क्र. पोप्रमा-०६१७/प्र.क्र.३५७/पोल-७.
मंत्रालय, दुसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.

दिनांक : ०३ मे २०१९.

<u>वाचा</u> :-
१) शासन निर्णय, गृह विभाग, क्र. सीआरपी-०५०६/ ११३२/ प्र.क्र.२५०/ पोल-७, दिनांक ०८.०३.२०१०
२) पोलीस महासंचालक, म.रा., यांच्या कार्यालयाचे पत्र क्र. पोमसं/ २७-बी/ २८-बी-२/ पो.स्टे.-अल्लीपूर-शानि.-बांध.-वर्धा/ १६०/ ०७, दिनांक ०३.०६.२०१७.

<u>प्रस्तावना</u> :-

पोलीस अधीक्षक, वर्धा, यांच्या आस्थापनेवरील पोलीस ठाणे, अल्लीपूर, तालुका-हिंगणघाट, येथे प्रकार-१ ची १८ व प्रकार-२ चे एक असे एकूण १९ सेवा निवासस्थाने यांचे बांधकाम करण्यासाठी शासन निर्णय, गृह विभाग, क्र. सीआरपी-०५०६/ ११३२/ प्र.क्र.२५०/ पोल-७, दिनांक ०८.०३.२०१०, द्वारे, रु.२,५५,३०,०००/- इतक्या खर्चाच्या अंदाजास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती. तथापि, उक्त कामासाठी निधी वितरित करण्यात न आल्याने उक्त काम सुरू होऊ शकले नाही.

२. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका यामधील परिच्छेद २६२ अनुसार *"बांधकामाला दिलेली प्रशासकनिक मान्यता किंवा अशा बांधकामाच्या अंदाजांना दिलेली तांत्रिक मंजुरी, ती दिलेल्या तारखेपासून पाच वर्षांच्या कालावधीनंतर सर्वसाधारणपणे अंमलात राहणार नाही."* या प्रकरणात उक्त कामासाठी प्रशासकीय मान्यता देऊन पाच वर्षांपेक्षा अधिक कालावधी झाल्याने उक्त प्रशासकीय मान्यता अंमलात नाही. म्हणून शासनाने पुढील निर्णय घेतला आहे.

<u>शासन निर्णय</u>.-

शासन निर्णय, गृह विभाग, क्र. सीआरपी-०५०६/ ११३२/ प्र.क्र.२५०/ पोल-७, दिनांक ०८.०३.२०१०, हा, याव्दारे, रद्द करण्यात येत आहे.

२. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०५०३१७२६४०५१२९ असा आहे. हा शासन निर्णय डीजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SWAPNIL
GOPAL BORSE

Digitally signed by SWAPNIL GOPAL BORSE
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=c6a6e7cad855fc787a96e36f11fbc87a9f66cfd9bad01184493f2735ad885627, postalCode=400032,
street=2ND FLOOR,MANTRALAYA,MADAME CAMA MARG,MUMBAI,
serialNumber=8538cd1e408948f7d025537d5f6589bd8958d1b95322e66d2cc5edf89ad0d79e, ou=HOME DEPT,
o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SWAPNIL GOPAL BORSE
Date: 2019.05.03 17:34:14 +05'30'

(स्वप्नील गोपाल बोरसे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) व्यवस्थापकीय संचालक, म.रा. पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्या., मुंबई.
३) विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर.
४) पोलीस अधीक्षक, वर्धा.

प्रत -

१) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, वर्धा.
२) कार्यासन अधिकारी (इमा.-२), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) निवड फाईल (पोल-७).